Vol 4 Issue 5 Nov 2014 ISSN No :2231-5063

# International Multidisciplinary Research Journal

# *Golden Research Thoughts*

Chief Editor
Dr.Tukaram Narayan Shinde

Publisher
Mrs.Laxmi Ashok Yakkaldevi

Associate Editor
Dr.Rajani Dalvi

Honorary
Mr.Ashok Yakkaldevi

## Welcome to GRT

**RNI MAHMUL/2011/38595** **ISSN No.2231-5063**

Golden Research Thoughts Journal is a multidisciplinary research journal, published monthly in English, Hindi & Marathi Language. All research papers submitted to the journal will be double - blind peer reviewed referred by members of the editorial board.Readers will include investigator in universities, research institutes government and industry with research interest in the general subjects.


## *International Advisory Board*

Flávio de São Pedro Filho
Federal University of Rondonia, Brazil

Kamani Perera
Regional Center For Strategic Studies, Sri Lanka

Janaki Sinnasamy
Librarian, University of Malaya

Romona Mihaila
Spiru Haret University, Romania

Delia Serbescu
Spiru Haret University, Bucharest, Romania

Anurag Misra
DBS College, Kanpur

Titus PopPhD, Partium Christian University, Oradea,Romania

Mohammad Hailat
Dept. of Mathematical Sciences, University of South Carolina Aiken

Abdullah Sabbagh
Engineering Studies, Sydney

Ecaterina Patrascu
Spiru Haret University, Bucharest

Loredana Bosca
Spiru Haret University, Romania

Fabricio Moraes de Almeida
Federal University of Rondonia, Brazil

George - Calin SERITAN
Faculty of Philosophy and Socio-Political Sciences Al. I. Cuza University, Iasi

Hasan Baktir
English Language and Literature Department, Kayseri

Ghayoor Abbas Chotana
Dept of Chemistry, Lahore University of Management Sciences[PK]

Anna Maria Constantinovici
AL. I. Cuza University, Romania

Ilie Pintea,
Spiru Haret University, Romania

Xiaohua Yang
PhD, USA

......More

## *Editorial Board*

Pratap Vyamktrao Naikwade
ASP College Devrukh,Ratnagiri,MS India

R. R. Patil
Head Geology Department Solapur University,Solapur

Rama Bhosale
Prin. and Jt. Director Higher Education, Panvel

Salve R. N.
Department of Sociology, Shivaji University,Kolhapur

Govind P. Shinde
Bharati Vidyapeeth School of Distance Education Center, Navi Mumbai

Chakane Sanjay Dnyaneshwar
Arts, Science & Commerce College, Indapur, Pune

Awadhesh Kumar Shirotriya
Secretary,Play India Play,Meerut(U.P.)

Iresh Swami
Ex - VC. Solapur University, Solapur

N.S. Dhaygude
Ex. Prin. Dayanand College, Solapur

Narendra Kadu
Jt. Director Higher Education, Pune

K. M. Bhandarkar
Praful Patel College of Education, Gondia

Sonal Singh
Vikram University, Ujjain

G. P. Patankar
S. D. M. Degree College, Honavar, Karnataka

Maj. S. Bakhtiar Choudhary
Director,Hyderabad AP India.

S.Parvathi Devi
Ph.D.-University of Allahabad

Sonal Singh,
Vikram University, Ujjain

Rajendra Shendge
Director, B.C.U.D. Solapur University, Solapur

R. R. Yalikar
Director Managment Institute, Solapur

Umesh Rajderkar
Head Humanities & Social Science YCMOU,Nashik

S. R. Pandya
Head Education Dept. Mumbai University, Mumbai

Alka Darshan Shrivastava
Shaskiya Snatkottar Mahavidyalaya, Dhar

Rahul Shriram Sudke
Devi Ahilya Vishwavidyalaya, Indore

S.KANNAN
Annamalai University,TN

Satish Kumar Kalhotra
Maulana Azad National Urdu University


**Address:-Ashok Yakkaldevi 258/34, Raviwar Peth, Solapur - 413 005 Maharashtra, India**
**Cell : 9595 359 435, Ph No: 02172372010 Email: ayisrj@yahoo.in Website: www.aygrt.isrj.org**

Golden Research Thoughts
ISSN 2231-5063
Impact Factor : 2.2052(UIF)
Volume-4 | Issue-5 | Nov-2014
Available online at www.aygrt.isrj.org

# मानसशास्त्र : अर्थ,स्वरुप व व्याप्ती

*महादेव उत्तम होनमुटे*

श्री विठ्ठल शिक्षणशास्त्र महाविद्यालय,वेणुनगर
गुरसाळे ता.पंढरपूर जि.सोलापूर

***सारांश :-*** मानसशास्त्र म्हणजे काय ?

Psychology या इंग्रजी शब्दाबद्दल मराठीमध्ये मानसशास्त्र हा शब्द वापरला आहे. Psychology हा दोन ग्रीक शब्दांपासून बनला आहे. Psyche म्हणजे आत्मा. Logos म्हणजे चर्चा यावरुन 'मानसशास्त्र म्हणजे आत्म्याविषयी चर्चा करणारे शास्त्र' अशी मानसशास्त्राची व्याख्या पुरातन काळी केली जात होती.

आत्म्याविषयी अभ्यास कसा करावयाचा हा प्रमुख प्रश्न होता. कारण आत्मा हा प्रत्येक सजीव प्राण्यात असतो. पण आत्म्याचे शरीरात नेमके स्थान कोणते. याचा उलगडा अद्याप झालेला नाही. त्यासंबंधी तर्काच्या साहयाने विचार मांडलेले दिसतात. त्यामुळे आत्म्यासंबधिचा विचार मानसशास्त्रात बाजूला पडला.

***प्रस्तावनाः—***

थोर ग्रीक तत्ववेता ॲरिस्टॉटल यांनी 'डि ॲनिमा' या ग्रथांत मानसशास्त्रासंबंधी विचार मांडले आहेत. त्यामध्ये त्यांनी मानसशास्त्राची व्याख्या सांगितली आहे.

'मानसशास्त्र म्हणजे मनाचा अभ्यास करणारे शास्त्र.' अशी मानसशास्त्राची व्याख्या केली आहे.

आत्म्याप्रमाणेच मन हे देखील गूढ विषय आहे. मन म्हणजे काय?. त्याचा आकार व स्वरुप कसे असते या प्रश्नांची उत्तरे शास्त्रीय आधाराने देता येत नाहीत. आत्म्याप्रमाणे मनाविषयीची ही उत्तरे समाधान कारक मिळत नाहीत. त्यामूळे ही व्याख्याही अपूर्ण आहे.

19 व्या शतकाच्या उत्तरार्धामध्ये मानसशास्त्रांच्या विकासाच्या दृष्टीने अनेक महत्वाच्या घटना घडल्या. पूढे इतर शास्त्रात वापरली जाणारी प्रायोगिक पध्दत मानसशास्त्रात वापरली जावी असा विचार पुढे आला. 1879 साली विल्हेम वुइंट या मानसशास्त्रज्ञाने जर्मनीतील 'लाईपझिंग' या विद्यापीठात मानसशास्त्राची पहिली प्रयोगशाळा सुरु केली. प्रायोगिक मानसशास्त्राचे हे जनक म्हणून ओळखले जातात. यांनी संवेदना,भावना,विचार यांचा अभ्यास प्रयोग पध्दतीने केला. यावरुन त्यांनी मानसशास्त्राची व्याख्या केली. 'मानसशास्त्र म्हणजे बोधा अवस्थेचे शास्त्र.' अशी व्याख्या करण्यात आली.

फॉईडने बोधावस्थेपेक्षा मनाच्या सुप्तावस्थेचा भाग फार मोठा आहे, सुप्तावस्थेत दडलेल्या भावना, इच्छा इत्यादींचा वर्तनावर खूपच परिणाम होतो. म्हणून अबोधावस्थेचा अभ्यास करणे आवश्यक आहे. असे प्रतिपादन केले. यावरुन मानसशास्त्राची व्याख्या सांगण्यात आली 'मानसशास्त्र म्हणजे अबोधावस्थेचा अभ्यास करणारे शास्त्र.'

ही व्याख्या ही अपुरी, अयोग्य व संकुचित वाटू लागली. वर्तनवादी मानसशास्त्रज्ञ वॉटसन यांनी 'मानसशास्त्र म्हणजे वर्तनाचे शास्त्र.' अशी नवीन व्याख्या केली. मानवी वर्तनाचा वस्तुनिष्ठ पणे अभ्यास करु शकतो. म्हणून वर्तन हाच मानसशास्त्राचा अभ्यासविषय होऊ शकतो, असे मत त्याने मांडले. मानसशास्त्र म्हणजे

मानवी वर्तनाचा अभ्यास करणारे शास्त्र अशी नवी व्याख्या आता मान्य झाली आहे.

वॉटसनने केवळ मानवी वर्तनाचा विचार केला. प्राण्यांच्या वर्तनाचा अभ्यास होणे गरजेचे आहे. असा विचार मॅकडयूगल यांनी मांडला यावरुन मानसशास्त्राची नवीन व्याख्या करण्यात आली. 'सजीव प्राण्यांच्या वर्तनाचा अभ्यास करणारे वास्तववादी शास्त्र म्हणजे मानसशास्त्र.' अशी व्याख्या केली.

वुडवर्थने वातावरणाच्या अनुंषंगाने व्यक्तीच्या ज्या किया घडतात, त्या कियांचे शास्त्र म्हणजे मानसशास्त्र अशी व्याख्या केली. या व्याख्येत किया हा शब्द व्यापक अर्थाने वापरण्यात आला. यात अंतर्गत – मानसिक व बाहय असे दोन्ही प्रकारचे वर्तन अपेक्षित आहे. म्हणजेच मानसशास्त्रात बाहय वर्तनाविष्काराबरोबरचे आंतरिक प्रक्रियांचाही अभ्यास केला जात आहे. विकासाच्या विविध अवस्थांमध्ये घडणारे वर्तन, विविध परिस्थितीत घडणारे वर्तन, सामाजिक वर्तन, असामान्य वर्तन इ. वर्तनविषय विविध घटनांचा अभ्यास मानसशास्त्रामध्ये अभिप्रेत झाला आहे.

सामान्य मानसशास्त्राबरोबरच मानसशास्त्राच्या विविध शाखा विकसित झाल्या आहेत. मानवी वर्तन या शास्त्राचा विचार होऊ शकतो. वर्तन हे निरीक्षणक्षम व प्रयोगक्षमही आहे. वर्तनाचा विविध क्षेत्रात शास्त्रीय अभ्यास केला जात आहे. वरील सर्व मानसशास्त्राच्या व्याख्यांचा विचार करता मानसशास्त्राची व्याख्या पुढीलप्रमाणे करण्यात आली. 'विकसित प्राण्यांच्या आंतरिक तसेच बाहय वर्तनाचे आणि त्या वर्तनामागील मानसिक प्रकियांचे अनुभवाश्रित पध्दतीने व वस्तुनिष्ठपणे अभ्यास करणारे नैसर्गिक, वर्णनात्मक व वास्तववादी शास्त्र म्हणजे मानसशास्त्र.' ही आजही व्याख्या सर्वमान्य आहे.

### *मानसशास्त्राचे स्वरुप*

कोणत्याही शास्त्राच्या अभ्यासाची सुरुवात निरीक्षणापासून होते. निरीक्षण नैसर्गिक परीस्थीतीत केले जाते किंवा प्रयोगासाठी मुद्दाम नियंत्रित केलेल्या परिस्थितीतील विविध गोष्टींचे व परस्परसंबंधाचे सूक्ष्म निरीक्षण केले जाते.निरीक्षणासाठी आवश्यक त्या अनेक उपकरणांची मदत घेतली जाते.कोणत्याही पूर्व ग्रहाचा विचार निरीक्षणावर होऊ दिला जात नाही. वस्तूनिष्ठ आणि अत्यंत काळीपूर्वक केलेल्या निरिक्षणातून निष्कर्ष काढले जातात. ज्या परिस्थितीत निरीक्षण करुन निष्कर्ष काढले, त्यासारख्या अन्य परिस्थितीतही ते निष्कर्ष खरे ठरतात किंवा नाही याचा पडताळा घेतला जातो. पडताळा घेत असताना जरुर तर मूळ निष्कर्षात सुधारण केल्या जातात. शेवटी सदैव सत्य ठरणा–या निष्कर्षांना नियमाचे स्वरुप घेऊन त्यांचा स्वीकार होतो. या पध्दतीने आपण वैज्ञानिक पध्दती म्हणतो.

मानसशास्त्रात मानवी वर्तनाचा अभ्यास करण्यासाठी वैज्ञानिक पध्दतीचा अभ्यास केला जातो. मानसशास्त्राच्या विविध शांखामध्ये वर्तनाचा अभ्यास करण्यासाठी प्रायोगिक पध्दतीचा वापर केला जातो. प्रयोगासाठी परिस्थितीचे नियंत्रण केले जाते. नियंत्रित परिस्थितीत वर्तनाचे निरीक्षण केले जाते. निरिक्षणासाठी उपकरणांचा वापर केला जातो. निरीक्षणांची नोंद घेऊन त्यांचे वर्गीकरण केले जाते. अनेक व्यक्तींच्या वर्तनाचे असे निरीक्षण केल्यानंतंर वर्तनविषयक सामान्य तत्वे निश्चित केली जातात. अशी सामान्य तत्वे म्हणजेच मानसशास्त्रीय सिध्दांत होत. प्रयोगाव्यतिरिक्त इतर पध्दतींचाही वर्तनाचा अभ्यास करण्यासाठी उपयोग केला जातो. या पध्दतींनाही शक्य तो शास्त्रशुध्द करण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे. यावरुन मानसशास्त्र हे शास्त्र या संज्ञेस पात्र असल्याचे स्पष्ट होते.

मानसशास्त्र हे वास्तववादी शास्त्र आहे. प्रत्यक्ष घडणा–या वर्तनाचा अभ्यास या शास्त्रात केला जातो. एखादा मुलगा खोटे बोलत असेल, तर तो मुलगा खोटे बोलतो म्हणजे काय करतो, तो खोटे बोलण्यास प्रवृत्त का झाला, त्याचे ते वर्तन कोणत्या परिस्थितीत घडते? याची शहानीशा मानसशास्त्र करील. पण खोटे बोलणे चांगले की वाईट, तो सदगुण की दूर्गण, याबाबत मानसशास्त्र चर्चा करणार नाही. सदगुणी,बुध्दमान,सदवर्तनी व्यक्तीच्या वर्तनाचा अभ्यास करुन त्याचे यथातथ्य वर्णन करणे हा मानसशास्त्राचा जितका जिव्हाळयाचा विषय आहे, तितिकाच दुर्वर्तनी किंवा निर्बुध्द व्यक्तीच्या वर्तनाचा अभ्यास करुन त्याचे सविस्तर वर्णन करणे हाही विषय आहे.

मानसशास्त्र व्याप्ती

मानसशास्त्र हा शास्त्रशुध्द विषय आहे. वर्तन म्हणजे केवळ बाहय शारीरिक हालचाल नव्हे. आंतरिक वर्तनाचाही त्यात समावेश होतो. ज्ञानात्मक, मानसिक, भावनात्मक या सर्वच प्रकारच्या वर्तनांचा अंतर्भाव मानसशास्त्राच्या अभ्यासविषयात होतो. मनुष्याचे प्रकट वर्तन अनेकविध परिस्थितींना अनुसरुन निरनिराळया कार्यक्षेत्रात त्याच्या भूमिका वेगवेगळया असतात. कुटुंबात त्याचा आई, वडील, भाऊ, बहीण यांच्याशी संबंध येतो. त्याच्यापासून त्याला अनेक गोष्टी शिकता येतात. त्यांच्या वर्तनात जडणघडण होते. मुलांचे लालन, पालन कसे करावे, त्यांना वळण कसे लावावे, यासाठी मुलांच्या मानसशास्त्राची ओळख पालकांना असण्याची गरज आहे.

त्यांचा विकास कसा होतो, हे माहित झाल्यावर मुलावंर यथायोग्य संस्कार करणे शक्य होईल. बालमानसशास्त्र ही मानसशास्त्राची स्वतंत्र शाखा विकसित झाली.

बालक पाच वर्षाचे झाले की शाळेत जाऊ लागते. शाळेत बालकावर संस्कार केले जातात. बालकाचा सर्वांगीण विकास व्हावा, या दृष्टीने बालकांना विविध अनुभव दिले जातात. बालकांना चांगले संस्कार करतील, त्यांचे शिक्षण चांगल्या प्रकारे कसे होईल, त्या दृष्टीने शैक्षणिक मानसशास्त्र मार्गदर्शन करील.

बालकाचे शिक्षण पूर्ण झाल्यावर त्याला एखादा उदयोग व्यवसाय करावा लागतो. हा उद्योग करीत असताना कामगारांचे कसे सहकार्य घेतले पाहिजे, त्यांना व्यावसायिक सुखसोयी कशा दिल्या पाहिजेत, उत्पादनवाढ कामगारांच्या मदतीने कशी करता येईल याचा अभ्यास औद्योगिक मानसशास्त्र करते.

याप्रमाणे प्रौढांचे मानसशास्त्र, वृध्दांचे मानसशास्त्र, बालकांचे मानसशास्त्र, विसामान्य मानसशास्त्र, सामाजिक मानसशास्त्र, शैक्षणिक मानसशास्त्र, औद्योगिक मानसशास्त्र, रुणांचे मानसशास्त्र, प्राण्यांचे मानसशास्त्र, वैयक्तिक भिन्नतेचे मानसशास्त्र, शरीर मानसशास्त्र, प्रायोगिक मानसशास्त्र अशा मानसशास्त्राच्या विविध शाखा विकसित झाल्या आहेत. मानवी जीवनाच्या सर्वच क्षेत्रात मानसशास्त्र प्रविष्ट झाले आहे. मानव जेथे जेथे आहे, त्या त्या ठिकाणी त्याच्या वर्तनाचा अभ्यास अपेक्षित आहे व त्याप्रमाणे मानसशास्त्राच्या विविध शाखा निर्माण झाल्या आहेत. यावरुन मानसशास्त्राची व्याप्ती किती विस्तृत आहे, हे सहज लक्षात येईल.

### *मानसशास्त्राचे उपयोग*

#### *शिक्षण :*

आधुनिक शिक्षण संपूर्णता मानसशास्त्रावर अवलंबून आहे. शिक्षणाची उदिदष्टे ठरविण्याचे काम शैक्षणिक तत्वज्ञान करते. ती उदिदष्टे कितपत साध्य होण्यासारखी आहेत, किंवा ती उदिदष्टे साध्य करण्याचे मार्ग कोणते हे मानसशास्त्र सांगते. बालकाचा सर्वांगीण विकास व्हावा, हे शिक्षणाचे प्रमुख उदिदष्ट आहे. हे उदिदष्ट कसे साध्य करता येईल याचे मार्गदर्शन मानसशास्त्र करते. मुलांचा बौध्दिक विकास करण्यासाठी परिणाम अध्यापन कसे करावे हे मानसशास्त्र सांगते. बालकाच्या व्यक्तिमत्वाचा विकास साधण्यासाठी, त्यांनी परिस्थितीशी कसे समायोजन साधावे, मानसिक आरोग्य कसे प्राप्त करावे, शैक्षणिक व व्यावसायिक मार्गदर्शन कसे करावे या सर्व प्रकारच्या कार्यात मानसशास्त्र हे शिक्षकाला मदत करते.

#### *चिकित्सा व रोगपरिहार*

डॉक्टर आजारी माणसाच्या आजाराची चिकित्सा करतात. आजाराचे कारण शोधून योग्य उपचार सुचवतात. योग्य औषधउपचाराबरोबरच रुणाची योग्य मनःस्थिती आवश्यक असते. रुणाचे विचार, भाव—भावना व श्रध्दा औषध उपचारावर डॉक्टर असण्याची गरज आहे. डॉक्टरांनी रुणाच्या मनात आत्मविश्वास जागृत केला पाहिजे. रुणाला आपण बरे होऊ असे वाटले पाहिजे. त्या दृष्टीने रुणांचे मानसशास्त्र जाणून घेण्यासाठी व त्यांना योग्य प्रकारे मार्गदर्शन करण्यासाठी मानसशास्त्राचा डॉक्टरांना खूप उपयोग होतो.

#### *उद्योगधंदे व व्यापार*

उत्पादन श्रेष्ठ दर्जाचे व भरपूर होण्यासाठी औद्योगिक क्षेत्रात योग्य आणि कार्यक्षम माणसांची निवड होणे आवश्यक असते. मानसशास्त्रीय कसोटयांच्या साह्याने सुयोग्य व्यक्तींची योग्य व्यवसायासाठी आपणास निवड करता येते.

कामगारांचे प्रशिक्षण, त्यांची कार्यक्षमता, कामाचे तास, विश्रांतीचा कालावधी, सुखसोयी, मजूर व मालक यांचे संबंध या सर्व बाबतीत औद्योगिक मानसशास्त्र हे उद्योगपती, अधिकारी व कामगार यांना मदत करते.

#### *कायदा व गुन्हेगारी*

गुन्हेगार गुन्हे का करतात? त्यांना सुधारण्यासाठी संधी दिली, तर त्यांच्यात सुधारणा घडवून आणता येईल का? या बाबतीत मानसशास्त्र हे शासनाला मदत करते.

#### *संरक्षण व युध्द*

सैन्यातील अधिका—यांची निवड करण्यासाठी मानसशास्त्रीय कसोटयांचा उपयोग केला जातो. सैनिकांचे व जनतेचे मनोधैर्य वाढविण्यास व टिकवून धरण्यास मानसशास्त्राची मदत होते. प्रत्यक्ष युध्द चालू

असताना व युध्द संपल्यानंतर जे जे विविध प्रश्न निर्माण होतात, ते सोडविण्यासाठी मानसशास्त्राची मदत होते.

### *सामाजिक, सांस्कृतिक व राजकीय जीवन*

मानसशास्त्राच्या अभ्यासामुळे व्यक्तीला कुटुंबात, समाजात चांगल्या प्रकारे जीवन जगता येते. चारचौघांशी कसे वागावे हे त्याला समजते. इतरांचे मन न दुखवता स्वतःचे ईप्सित कसे साध्य करावे हे त्याला चांगले समजते.

सांस्कृतिक क्षेत्रात विविध कलागुणांच्या विकासास कसा हातभार लावावा, कलाकरांना प्रेरणा कशा द्याव्यात, याबाबत मानसशास्त्राचीच मदत होते.

राजकीय क्षेत्रात मानशास्त्राला महत्वाचे स्थान आहे. शासनाने जनमताची कदर केली, तरच ते टिकू शकते. म्हणून शासनकर्त्यांनी जनतेची नाडी मानसशास्त्राच्या साहयाने समजू शकते. लोकशाही शासनप्रणालीत जनता शासनकर्त्यांची निवड करीत असते. निवडणूक जिंकण्यासाठी लोकांची मने जिकांवी लागतात. त्यासाठी खास प्रचारतंत्र अवलंबावे लागते. या सर्व बाबतीत नेत्यांना मानसशास्त्राचा खूप उपयोग होतो.

### *मानसशास्त्राच्या मर्यादा*

मानसशास्त्राचे उपयोग अनेक क्षेत्रात होत असेल तरी त्याच्या मर्यादा विचारात घेणे आवश्यक आहे. मानसशास्त्रात सजीव प्राण्यांच्या व मानवाच्या वर्तनाचा अभ्यास अपेक्षित आहे. त्यांचे वर्तन अभ्यास करण्यासाठी त्यांच्यापासून वेगळे करता येत नाही. दृश्य वर्तन अभ्यास करण्यासाठी त्यांच्यापासून वेगळे करता येत नाही. दृश्य वर्तन काटेकोरपणे अभ्यासले तरी आंतरिक वर्तन पूर्णपणे अभ्यासता येणार नाही. आंतरिक वर्तनाबाबत आपणास अंदाजच करावा लागेल किंवा त्या व्यक्तीने सांगितलेल्या माहितीवर अवलंबून राहावे लागेल. म्हणजे निष्कर्षांमध्ये व्यक्तिनिष्ठता येण्याची शक्यता आहे. इतर भौतिकशास्त्रांच्या तुलनेने मानसशास्त्रीय निष्कर्ष शंभर टक्के विश्वासार्ह व वस्तुनिष्ठ असू शकणार नाहीत.

बाहय वर्तन हे आंतरिक वर्तनानुसार सुसंगत पाहिजे. परंतू काही व्यक्तींच्या बाबतीत असा सुसंगतपणा असेलच असे नाही. त्यामुळे ब–याच वेळा फसगत होण्याची शक्यता आहे. वरवर गोड बोलणा–या माणसांच्या अंतःकरणात काहीतरी स्वार्थी विचार असण्याची शक्यता असते, तेव्हा बाहयवर्तनाचा देखील काळजीपूर्वक अभ्यास केला पाहिजे.

मानसशास्त्रात सजीव प्राण्यांवर प्रयोग केले जातात. प्रयोगासाठी परिस्थितीचे नियंत्रण आवश्यक असते. बाहय परिस्थितीचे आपणास नियंत्रण करता येईल. परंतू प्रयोज्याच्या मानसिक स्थितीवर नियंत्रण कसे ठेवणार? तेव्हा या मर्यादा डोळयासमोर ठेवूनच मानवी वर्तनाचा जास्तीत जास्त वस्तुनिष्ठपणे अभ्यास केला पाहिजे.

### *संदर्भ ग्रंथ*

1.सूबोध शैक्षणिक व प्रायोगिक मानसशास्त्र : प्र.ल.नानकर,संगिता शिरोडे, नित्य नूतन प्रकाशन, पूणे
2.शैक्षणिक व प्रायोगिक मानसशास्त्र : ह.ना. जगताप, नित्य नुतन प्रकाशन, पूणे
3.माऊली बी.एड्. : नागेश दत्तात्रय सर्वदे, प्रणव प्रकाशन, श्रीपूर

# Publish Research Article
# International Level Multidisciplinary Research Journal
# For All Subjects

Dear Sir/Mam,

We invite unpublished Research Paper,Summary of Research Project,Theses,Books and Book Review for publication,you will be pleased to know that our journals are

## Associated and Indexed,India

- International Scientific Journal Consortium
- OPEN J-GATE

## Associated and Indexed,USA

- EBSCO
- Index Copernicus
- Publication Index
- Academic Journal Database
- Contemporary Research Index
- Academic Paper Databse
- Digital Journals Database
- Current Index to Scholarly Journals
- Elite Scientific Journal Archive
- Directory Of Academic Resources
- Scholar Journal Index
- Recent Science Index
- Scientific Resources Database
- Directory Of Research Journal Indexing

Golden Research Thoughts
258/34 Raviwar Peth Solapur-413005,Maharashtra
Contact-9595359435
E-Mail-ayisrj@yahoo.in/ayisrj2011@gmail.com
Website : www.aygrt.isrj.org